गणरायाच्या चरणी साकडे घालत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी दिल्लीतील कार्यालयात केली आरती >> पान 2

गणपती दर्शन: श्रद्धा, संस्कृती आणि सोहळा >> पान 3

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा दणका! आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी थेट रस्त्यावर; चार दिवसांत काम सुरु करण्याचे आश्वासन >> पान 4


**सुविचार**

आपल्या कुटुंबाला नेहमी प्राधान्य द्या.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com   मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 41 ■ सोमवार, दि. 01 सप्टेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




**प्रिया मराठेचं निधन, ती शेवटची पोस्ट व्हायरल; सोशल मीडियावर सक्रिय नव्हती अभिनेत्री**

आतील पान

# बेशुद्ध आंदोलकाचे डॉक्टरांनी वाचवले प्राण!

## मराठा मोर्चात हृदयद्रावक क्षण वैद्यकीय देवदूतांची धावपळ वेळेत आली उपयोगी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान एक अत्यंत भावनिक आणि थरारक क्षण सर्व साक्षीदारांनी अनुभवला. शेकडो आंदोलकांच्या गर्दीत एका आंदोलकाला अचानक चक्कर येऊन तो बेशुद्ध पडला. काही क्षणांतच घटनास्थळी भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, गर्दीत उपस्थित असलेल्या डॉक्टरांनी दाखवलेली तत्परता आणि धाडस यामुळे एका जीवाला नवजीवन लाभले.

**डॉ. दिलीप निकम यांचा प्रसंगावधान आणि वैद्यकीय कसब...**

आंदोलनस्थळी वैद्यकीय सेवेसाठी स्वयंसेवक म्हणून कार्यरत असलेले डॉ. दिलीप निकम, जे बॉम्बे रुग्णालयात कार्यरत आहेत, यांनी घटनास्थळी हे लक्षात घेताच क्षणाचाही विलंब न करता धाव घेतली. संबंधित व्यक्तीची नाडी चालू नव्हती, श्वासोच्छ्वास थांबल्याची लक्षणं दिसत होती. परिस्थिती गंभीर असल्याचं लक्षात येताच त्यांनी त्वरित CPR (Cardiopulmonary Resuscitation) सुरू केले.

**हजारो जण स्तब्ध... मृत्यूपासून माणूस परत जिवंत!**

गर्दीने श्वास रोखून पाहिलं. डॉक्टरांच्या प्रत्येक दाबानंतर लोक आशेने पाहत होते. काही क्षणांनी त्या आंदोलकाने डोळे उघडले, श्वास सुरू झाला आणि सर्वत्र आनंदाचे आणि भावनिकतेचे वातावरण पसरले. उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. एक जीव वाचल्याचे समाधान प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते.

**डॉ. सूर्यकांत चौधरी यांचाही मोलाचा सहभाग**

या प्रयत्नात डॉ. सूर्यकांत चौधरी यांनी देखील महत्त्वाची भूमिका बजावली. रुग्णाची स्थिती स्थिर झाल्यानंतर, तातडीने ॲम्ब्युलन्स बोलावून त्याला जवळच्या मोठ्या रुग्णालयात हलवण्यात आले.

**सेवाभावाचा सर्वोच्च आदर्श**





ही घटना वैद्यकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरावी अशीच आहे. मोर्चात सहभागी होत असताना देखील, सेवा देण्याची जाणीव ठेवत प्रसंगावधान राखून दाखवलेली तत्परता म्हणजेच खरं सामाजिक उत्तरदायित्व. डॉ. दिलीप निकम आणि डॉ. सूर्यकांत चौधरी यांचे कार्य लाखोंच्या जिवाला प्रेरणा देणारे आहे.

सामाजिक आंदोलनात माणुसकी जपणारा क्षण

सामाजिक लढ्यांमध्ये केवळ घोषणा, मागण्या आणि मोर्चे यांचं अस्तित्व नसतं, तर अशा संवेदनशील प्रसंगांमधून माणुसकीचे दर्शन घडते. आजचा प्रसंग हेच अधोरेखित करतो की, ''माणूस हा माणसासाठी असतो!''

## ठाण्यात ८० हजार कुटुंबांचे धोकादायक इमारतींत वास्तव्य

**ठाणे/प्रतिनिधी:** विरारमध्ये इमारत कोसळून १७ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. ठाण्यातही धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतीमध्ये नागरिकांचे वास्तव्य असून अशा इमारतीमध्ये अजूनही तब्बल ८० हजार कुटुंबे राहत आहेत. एकदा राहते घर सोडले की हक्काचा निवारा गमावून बसण्याच्या भीतीपोटी रहिवासी इमारती रिकाम्या करण्यास तयार नाहीत. या इमारती रिकाम्या करताना पालिका प्रशासनाची मात्र चांगलीच दमछाक होत आहे.

विरारच्या घटनेनंतर ठाण्यातील अतिधोकादायक व धोकादायक इमारतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ठाणेकरांवर मृत्यूची टांगती तलवार कायम असून ३ लाख २७ हजार २९० ठाणेकरांचा मुक्काम मृत्यूच्या छायेत आहे. ठाणे महापालिका हद्दीत ९३ इमारती अति धोकादायक तर २०० धोकादायक आहेत.

ठाण्यात गेल्या अनेक वर्षांपासून धोकादायक, अति धोकादायक आणि बेकायदा इमारतींचा प्रश्न लटकलेला आहे. अशातच शहरातील शेकडो धोकादायक इमारतीमध्ये लाखो ठाणेकर जीव मुठीत घेऊन संसाराचा गाडा हाकत आहेत. एकीकडे क्लस्टर योजनेचे स्वप्न दाखवण्यात आले असताना अद्याप क्लस्टर योजनेची इमारत पूर्ण झालेली नाही. त्यामुळे हक्काचे घर मिळेल या आशेने इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांमध्ये धडकी भरत आहे. प्रशासनाकडून दरवर्षी धोकादायक इमारतींची यादी प्रसिद्ध करण्यात येते. त्यानुसार ९ प्रभाग समितीमधील अतिधोकादायक व धोकादायक इमारतीची यादी पालिकेने शनिवारी जाहीर केली आहे.

## मनोज जरांगेंची अपेक्षा माफक, तातडीने आरक्षण द्या, रवींद्र धंगेकरांचा सरकारला घरचा आहेर!

**मुंबई/प्रतिनिधी:** मुंबईच्या आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाने आता राज्यातील राजकारण ढवळून निघाल्याचं पहायला मिळतंय. राज्यातील अनेक नेत्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या गाठीभेटी घेण्यास सुरू केल्या असून आता राजकारणात मोठ्या घडामोडी घडत असल्याचं समोर येत आहे. अशातच आता पुण्याचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी मराठा आरक्षणासाठी उपोषण करत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देत सरकारवर जोरदार टीका केली आहे.

न्याय आणि भाकरीही मिळाली पाहिजे

मनोज जरांगे पाटलांची अपेक्षा माफक असल्याचे सांगत, सरकारने त्यांची मागणी त्वरित सोडवावी, असे धंगेकर म्हणाले. यावेळी बोलताना ते म्हणाले, ''मी आमदार असतानाही हीच बाजू मांडली होती. सर्वसामान्य लोकांना शिक्षण आणि नोकरीची मोठी समस्या भेडसावत आहे. त्यामुळे सर्वांना न्याय मिळाला पाहिजे आणि भाकरीही मिळाली पाहिजे.''

एक महिला मदतीसाठी आली होती – धंगेकर

मराठा समाज म्हणजे श्रीमंत असा समज अनेकांमध्ये आहे, पण प्रत्यक्षात तशी परिस्थिती नाही, असे धंगेकर यांनी स्पष्ट केले. मराठवाड्यासारख्या भागातील मराठा समाज पिचलेला आहे. मराठा समाजाची एक महिला त्यांच्याकडे मदतीसाठी आली होती, तिची फी त्यांनी स्वत: भरल्याचा प्रसंगही त्यांनी सांगितला. याआधीच्या सरकारमधील नेत्यांनी मराठा आणि इतर समाजांना आरक्षणाचे आश्वासन दिलं होतं. आता ते सर्व नेते सत्तेत आहेत, त्यामुळे त्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करावीत, असे म्हणत धंगेकर यांनी सरकारवर 'घरचा आहेर' दिला.

# 'सरसकट' कुणबीसाठी मनोज जरांगेंचं आमरण उपोषण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली असून सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमात्रपत्र देण्याचीही मागणी त्यांची आहे. मात्र, मराठा बांधवांना 'सरसकट कुणबी' संबोधण्यास हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाचा सपशेल नकार आहे. त्यामुळे, मराठा आरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीसमोर कोर्टाच्या निर्णयांचा मोठा पेच दिसून येतो. दोन्ही कोर्टाचे निकाल या मार्गातील सर्वात मोठे अडसर ठरत आहेत. अशात, महाअधिवक्त्यांसोबत ह्या पेचावर सल्लामसलत करण्यासाठी संध्याकाळी ५ वाजता बैठक उपसमितीची बैठक होणार आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी देखील या बैठकीबाबत माहिती दिली आहे.




दरम्यान, सरसकट कुणबी उल्लेख करता येणार नसल्याने आरक्षणासाठी कोर्टाचा अडसर आहे. यापूर्वी उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात दाखल प्रकरणावरुन ही बाब समोर आली आहे. मराठा आरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या उपसमितीची आज राज्याच्या महाधिवक्त्यांसोबत बैठक होणार असून राधाकृष्ण विखे पाटील याचे प्रमुख आहेत. त्यामुळे, या बैठकीनंतर नेमकं याप्रकरणी कसा मार्ग निघतो हे पाहावे लागेल.

नेमकं काय आहेत ही प्रकरणे –

बाळासाहेब रंगनाथ चव्हाण यांना जात पडताळणी समितीने २००१ मध्ये कुणबी प्रमाणपत्र दिले होते. त्यावर जगन्नाथ होले यांनी तक्रार दाखल केली. मात्र, दाद न मिळाल्याने जगन्नाथ होले हे मुंबई उच्च न्यायालयात गेले. यात महाराष्ट्र शासन आणि बाळासाहेब चव्हाण यांना प्रतिवादी करण्यात आले होते. १७ ऑक्टोबर २००३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्या.बी.एच.मर्लापल्ले आणि न्या.ए.एस. बग्गा यांनी निकाल दिला.या आदेशातील परिच्छेद १७ मध्ये म्हटले आहे की, या प्रकरणात सदर प्रमाणपत्र मान्य केले तर महाराष्ट्रात संपूर्ण मराठा समाज हा कुणबी म्हणून स्वीकारावा लागेल आणि असे झाले तर तो सामाजिक मूर्खपणा (सोशल ॲब्सर्डिटी) ठरेल. उच्च न्यायालयाच्या या निकालाविरोधात बाळासाहेब चव्हाण हे सुप्रीम कोर्टात गेले आणि तेथे त्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान दिले. सुप्रीम कोर्टात न्या.बी. एन. अग्रवाल आणि न्या.पी.के. बालसुब्रमण्यम यांच्या खंडपीठाने १५ एप्रिल २००५ रोजी निकाल दिला. सांगितले की, मुंबई हायकोर्टाचा निर्णय योग्य आहे, त्यात हस्तक्षेप करण्याची आम्हाला काहीच गरज वाटत नाही. त्यामुळे आम्ही ही याचिका खारीज करतो आहोत, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

दुसऱ्या प्रकरणातही तोच निकाल

दरम्यान आणखी एक प्रकरण उच्च न्यायालयात गेले, ते होते सुहास दशरथे विरुद्ध महाराष्ट्र सरकार यावर निकाल आला. ६ ऑक्टोबर २००२ रोजीचे खंडपीठ होते: न्या. मार्लापल्ले आणि न्या. एन. व्ही. दाभोळकर यांच्या निकालातील परिच्छेद ४६ म्हणतो की, जात पडताळणी समितीकडे जी भूमिका मांडण्यात आली, ती स्वीकारण्यात आली, तर मराठा समाजाच्या प्रत्येक व्यक्तीला कुणबी प्रमाणपत्र द्यावे लागेल आणि असे केले तर ते महाराष्ट्रातील वास्तविक सामाजिक व्यवस्थेच्या (स्टार्क सोशल रियालिटीज) विरोधात असेल. त्यामुळे, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे किंवा निकालाप्रमाणे सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देता येत नाही, हीच सरकारपुढे सर्वात मोठी अडसर आहे.

# सरकारने आरक्षणापासून पळ काढू नये– हर्षवर्धन सपकाळ

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठा आरक्षण आंदोलनाबाबत राजधर्म पाळण्यास तयार नाहीत, त्यांनी पूर्वी ७ दिवसांत निर्णय घेऊ असे फडणवीस यांनी जाहीर केले होते, त्याचे काय झाले? आता सरकार त्यापासून पळ काढत आहे, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नगरमध्ये बोलताना केला.



गणपतीने मुख्यमंत्र्यांना सुबुद्धी द्यावी आणि त्यांची दुर्बुद्धी दूर करावी, अशी प्रार्थना करतो असेही प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले. आंदोलकांचे हाल करण्याचा सरकारचा कुटील डाव दिसतो, खरंतर या प्रश्नाला सामाजिक आयाम आहेत. परंतु मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यातून मराठा–ओबीसी यांच्यामध्ये द्वेषाचा विचार पेरला जात आहे. त्याला तिलांजली देण्यासाठी तरी राजधर्म पाळावा लागणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

आंदोलकांना एकएक दिवस मुदतवाढ दिली जात आहे. आंदोलकांची एवढी अफाट गर्दी आहे. मग पोलीस काय झोपले होते का? कुंभमेळ्याच्या वेळी केली जाते तशी व्यवस्था करायला काय हरकत होती? सरकारचे ते मूलभूत कामच होते, म्हणूनच आम्ही त्यांना राजधर्म पाळा असे म्हणत आहोत, असेही सपकाळ म्हणाले.

आंदोलन काही एकदम मुंबई धडकलेले नाहीत. तीन महिने अगोदर त्यांनी आंदोलन जाहीर केले होते, त्यावेळेस सरकार झोप काढत होते का? आरक्षणावर आंदोलकांशी चर्चा करायला हवी होती, परंतु राजधर्म पाळण्यास देवेंद्र फडणवीस तयार नाहीत, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. गणपतीने त्यांना सुबुद्धी द्यावी व त्यांची दुर्बुद्धी दूर करावी.

काँग्रेसने यापूर्वीच आपली भूमिका जाहीर केली आहे. सर्वपक्षीय निवेदन व विधानसभेतही ठरावाच्या बाजूने काँग्रेस उभी राहिली. परंतु त्यावेळी सात दिवसात निर्णय घेऊ असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले होते, त्याचे काय झाले? मागील वेळी मुंबईत आंदोलन वेशीपाशी आल्यावर काय सांगितले होते आणि कोणत्या कारणाने गुलाल उधळला गेला होता. त्यामुळे सरकारने आता पळ काढू नये. असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

आरक्षणाच्या मुद्द्यासाठीच काँग्रेसला जातनिहाय जनगणना हवी आहे. 'जिसकी जितनी हिस्सेदारी, उतनी उसकी भागीदारी' या आधारावर काँग्रेस पक्ष देशभर आक्रमक भूमिका घेऊन जात आहे. काँग्रेसचे राज्य असलेल्या तेलंगणामध्ये जातनिहाय जनगणना करून काँग्रेसने सर्व घटकांना न्याय देण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत, त्यामुळे काँग्रेसच्या प्रश्नावर मागे नाही असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास सपकाळ नगरमध्ये उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना वरील भूमिका स्पष्ट केली.

## उदयनराजे, शिवेंद्रराजेंनी जरांगे पाटलांच्या मंडपात उपोषणाला बसलं पाहिजे, पण हे भाजपचे हस्तक; संजय राऊतांचा हल्लाबोल

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे मुंबईच्या आझाद मैदानवर तीन दिवसांपासून उपोषण सुरु आहे. या उपोषणासाठी राज्यभरातून मराठा आंदोलक मोठ्या संख्येने मुंबईत दाखल झाले आहेत. याच दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे दोन दिवसीय मुंबई दौऱ्यावर आले होते. अमित शाह आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मुंबईत बैठक पडली. तर एकनाथ शिंदे हे अमित शाह यांच्या भेटीनंतर आपल्या गावी दरे गाव येथे गेल्याचे पाहायला मिळाले. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अमित शाह आणि एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधलाय. तसेच भाजपचे खासदार उदयनराजे भोसले आणि मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्यावर देखील संजय राऊत यांनी हल्लाबोल केलाय.

संजय राऊत म्हणाले की, मुंबईमध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मराठा बांधव आले आहेत. त्यांचे नेते जरांगे पाटील आझाद मैदानावर भर पावसात उपोषणाला बसले आहेत. हजारोंच्या संख्येने मराठा बांधव इथे आल्याने मुंबईतला बराचसा भाग विस्कळीत झाला आहे. काल इथे देशाचे गृहमंत्री अमित शाह येऊन गेले. त्यांच्यासोबत भाजपचं सगळं लटांबर होतं. उपमुख्यमंत्री जे दरेगावला गेले आहेत ते देखील त्यांचं शेपूट घेऊन त्यांच्यासोबत फिरत होते.

इतका मोठा गंभीर प्रश्न मुंबईत सुरू आहे. हजारो–लाखो लोक मुंबईत येत आहेत आणि तो विषय केंद्राशी संबंधित आहे. आमची अपेक्षा होती की, देशाचे गृहमंत्री आझाद मैदानावर जातील, त्यांना दिलासा देतील, तोडगा काढण्याचा प्रयत्न करतील आणि हा विषय जो ऐन गणेशोत्सवात निर्माण झालेला आहे तो शांत करतील. जे गृहमंत्री काश्मीरचा प्रश्न सोडवू शकतात, ३७० कलम हटवू शकतात, त्यासाठी घटनेत बदल करू शकतात. ते गृहमंत्री मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी सुद्धा त्या घटनेत बदल करू शकतात, असा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला.

## वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे

रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी ही सध्याची मोठी समस्या बनली आहे. दिवस असो की रात्र, वेळ कोणतीही असो रस्ता कोणताही असो मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुंबई किंवा मुंबईतून कुठेही जाणारे राज्य – राष्ट्रीय महामार्ग सगळीकडे प्रचंड वाहतूक कोंडी दिसते. पूर्वी हे चित्र शनिवार, रविवार किंवा जोडून सुट्ट्या आलेल्या दिवशी व्हायची आता ती रोजच होती. या वाहतूक कोंडीने रस्त्यांवर वाहनांच्या रांगाच्या रांगा लागलेल्या असतात त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. ज्या प्रवासास पूर्वी एक ते दीड तास लागायचा त्याच प्रवासासाठी नागरिकांचा आता दुप्पट वेळ लागत आहे. सकाळ, संध्याकाळ यासारख्या पीक अवरमध्ये तर वाहने अगदी कासव गतीने धावतात. वाढत्या वाहन कोंडीमुळे शहरातील नागरिक त्रस्त आहे. ही वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शासनाने उड्डाणपूल केले पण आता त्याच उड्डाणपुलावर वाहनांची कोंडी होताना दिसत आहे. अनेक प्रयत्न करूनही वाहतूक कोंडी कमी करण्यात प्रशासनाला यश येत नाही. वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे आहेत त्यातील मुख्य कारण आहे ते म्हणजे वाहनांची वाढती संख्या. वाढत्या वाहतूक कोंडीला वाहनांची प्रचंड संख्या जबाबदार आहे. आज लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. दरवर्षी त्यात हजारो वाहनांची भर पडते. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहे. वाढत्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली तशीच पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात परिणामी अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे. पार्किंगची सोय नसल्याने नागरिक रस्त्यांच्या कडेला आपल्या गाड्या पार्क करतात त्यामुळेही वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी शासन, प्रशासनाकडून नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याच्या सूचना दिल्या जातात. मात्र नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. नवीन वाहन विकत घेऊन नागरिक आपल्या खाजगी वाहनांनी प्रवास करत आहे. बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना चांगली सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासनाने जर या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्या तर नागरिक स्वतःच्या वाहनांनी प्रवास न करता सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची संख्या कमी होईल आणि वाहनाची संख्या कमी झाली की रस्त्यांवरील वाहतूक कोंडी देखील कमी होईल. जर रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्याची शासन प्रशासनाची मनापासून इच्छा असेल तर त्यांनी आधी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करूनच वाहतूक कोंडी रोखता येईल.

# गणरायाच्या चरणी साकडे घालत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी दिल्लीतील कार्यालयात केली आरती

## आरतीतून देशासाठी सुख, समृद्धी आणि शेतकऱ्यांसाठी उज्वल भविष्याची प्रार्थना

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/कार्यालय प्रतिनिधी:** दिल्लीतील २३ अशोका रोड येथील शासकीय निवासस्थानी केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत गणपती बाप्पाची विधीवत पूजा आणि आरती मोठ्या भक्तिभावाने पार पडली. गणेश चतुर्थीनिमित्त कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी गणरायाची स्थापना केली असून, गेल्या काही दिवसांपासून इथे पारंपरिक पद्धतीने पूजाअर्चा सुरु आहे.

शनिवारी (दि. ३० ऑगस्ट) रोजी मंत्री जाधव स्वतः उपस्थित राहून गणरायाची मनोभावे पूजा केली. आरती करताना त्यांनी देशातील जनतेच्या सुख, समृद्धी व निरोगी आयुष्याची प्रार्थना केली. विशेषत: ''बळीराजाला चांगले दिवस यावेत,'' अशी मनोभावना व्यक्त करत त्यांनी गणरायाच्या चरणी साकडे घातले.



### केंद्रीय मंत्र्यांचे बळीराजासाठी साकडे

गणरायाच्या चरणी मनोभावे आरती करताना केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी देशातील शेतकरी, म्हणजेच बळीराजाच्या कल्याणासाठी खास प्रार्थना केली.''बळीराजाला चांगले दिवस यावेत, निसर्गाची साथ लाभावी, मेहनतीला योग्य मोबदला मिळावा आणि त्याच्या जीवनात आनंद नांदावा,'' असे भावनिक शब्द त्यांनी गणरायाच्या चरणी उच्चारले. शेतकरी हा देशाचा खरा कणा आहे. नैसर्गिक आपत्ती, कर्जबाजारीपणा आणि बाजारपेठेतील अस्थिरता यांमुळे बळीराजाचं जीवन दिवसेंदिवस कठीण होत आहे. अशा परिस्थितीत एका केंद्रीय मंत्र्याने शासकीय गणेशपूजनाच्या निमित्ताने थेट शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःख दूर होण्यासाठी प्रार्थना करणे, हे निश्चितच सामाजिक संवेदनशीलतेचं दर्शन घडवतं. गणरायाच्या चरणी साकडं घालताना मंत्री जाधव यांनी फक्त शब्द नव्हे, तर एक आशा व्यक्त केली की देशातील अन्नदाता सुखी राहावा, त्याच्या घरातही गणपतीसारखा उत्सव आनंदाने साजरा व्हावा.

पूजा व आरतीनंतर मंत्री जाधव म्हणाले, ''गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि एकात्मतेचे प्रतीक आहे. आपल्या कार्यालायात दरवर्षी गणपती बसवण्याची ही परंपरा कर्मचाऱ्यांनी जपली आहे, याचा मला अभिमान वाटतो.''

या धार्मिक सोहळ्याला आयुष मंत्रालय व आरोग्य मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी यांच्यासह दिल्लीतील मराठी पत्रकार, गणेशभक्त आणि स्थानिक नागरिकांची उपस्थिती होती. प्रसाद वाटप, भक्तिगीते आणि पारंपरिक वातावरणात पूजनसोहळा अत्यंत भावनिक आणि उत्साही वातावरणात पार पडला.

कार्यालयात दरवर्षी गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. हा सण केवळ धार्मिक श्रद्धेचा नव्हे, तर कार्यालयीन एकतेचा व सामाजिक सलोख्याचा प्रतीक बनला आहे. विविध विभागातील कर्मचाऱ्यांच्या सहभागामुळे यंदाचा उत्सव विशेषच संस्मरणीय ठरला आहे.

# माझी बहीण लढवय्या होती, पण तिची ताकद कमी पडली, प्रिया मराठेच्या निधनानंतर अभिनेता सुबोध भावेची पोस्ट

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठी अभिनेत्री प्रिया मराठे हिचे शनिवारी पहाटे मुंबईत निधन झाले. ती ३८ वर्षांची होती. गेल्या काही वर्षांपासून प्रिया मराठे हिला कर्करोगाची लागण झाली होती. तिने यावर मातही केली होती. मात्र, गेल्या काही महिन्यांमध्ये कर्करोग पुन्हा तिच्या शरीरात पसरु लागला होता. तिच्यावर उपचारही सुरु होते. मात्र, शनिवारी पहाटे तिची प्राणज्योत मालवली. प्रिया मराठे हिच्या अकाली जाण्याने मराठी रसिकांना मोठा धक्का बसला आहे. प्रिया मराठे हिने छोट्या पडद्यावरील अनेक मराठी आणि हिंदी मालिकांमध्ये काम केले होते. अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये काम केल्यामुळे तिचा चेहरा घराघरात पोहोचला होता. त्यामुळे तिच्या निधनाने मनोरंजनसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

प्रिया मराठे हिच्या निधनानंतर अभिनेता सुबोध भावे याने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत आपल्या भावनांना मोकळी वाट करुन दिली. त्याने म्हटले की, '' प्रिया मराठे '' एक उत्तम अभिनेत्री, काही मालिका आणि चित्रपटात माझी सहकलाकार. पण माझ्यासाठी त्याही पेक्षा महत्त्वाच नातं तिच्या बरोबर होतं. प्रिया माझी चुलत बहीण. या क्षेत्रात आल्यावर तिने घेतलेली मेहेनत,कामावरची तिची श्रद्धा या गोष्टी खूप कौतुकास्पद होत्या. प्रत्येक भूमिका तिने अतिशय मनापासून आणि समरस होऊन साकारली. काही वर्षांपूर्वी तिला कॅन्सर च निदान झालं. त्याच्याशी झगडून ती पुन्हा एकदा काम करायला लागली. नाटक, मालिका या मधून पुन्हा आपल्या सहज सुंदर अभिनयाने ती प्रेक्षकांसमोर गेली. पण त्या कॅन्सरने काही तिची पाठ सोडली नाही. '' तू भेटशी नव्याने '' या आमच्या मालिकेदरम्यान पुन्हा एकदा तिचा त्रास उफाळून आला. या संपूर्ण प्रवासात तिचा जोडीदार शंतनू मोघेहा भक्कमपणे तिच्याबरोबर होता. माझी बहीण लढवय्या होती, पण अखेर तिची ताकद कमी पडली. प्रिया तूला भावपूर्ण श्रद्धांजली तू जिथे असशील तिथे तुला शांतता लाभावी हीच प्रार्थना. ओम शांती, असे सुबोध भावे याने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

गेल्या काही दिवसांपासून प्रिया मराठे हिच्यावर मुंबईतील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र, तिचे शरीर या उपचारांना प्रतिसाद देत नव्हते. अखेर आज पहाटे प्रिया मराठे हिने मिरारोड येथील तिच्या राहत्या घरी शेवटचा श्वास घेतला. तिच्यावर दुपारी तीन वाजता मिरारोड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जातील.

## प्रिया मराठेचं निधन, ती शेवटची पोस्ट व्हायरल; सोशल मीडियावर सक्रिय नव्हती अभिनेत्री

**मुंबई/प्रतिनिधी:** लोकप्रिय मराठी अभिनेत्री प्रिया मराठेचे ३८ व्या वर्षी निधन झाले आहे. कर्करोगाशी तिची सुरू असलेली झुंज अपयशी ठरली. तिच्या निधनाने मराठी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. मिरा रोडवरील राहत्या घरी तिने अखेरचा श्वास घेतला.

अभिनेत्रीने आजवर अनेक मराठी–हिंदी मालिकांमध्ये काम करीत एक वेगळी निर्माण केली होती. 'या सुखांनो या' या मालिकेतून तिने टेलिव्हिजनवर पदार्पण केले. त्यानंतर 'तू तिथं मी', 'चार दिवस सासूचे', 'ऑलमोस्ट सुफळ संपूर्ण', 'येऊ कशी कशी मी नांदायला', 'तुझेच मी गीत गात आहे' अशा मालिकांमध्ये तिने विविध धाटणीच्या भूमिका साकारत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. 'पवित्र रिश्ता' मालिकेतील तिची भूमिका विशेष गाजली. या मालिकेत तिने वर्षा ही भूमिका साकारली होती.

त्याबरोबरच तिच्या 'चार दिवस सासूचे' या मालिकेतील भूमिकेचेदेखील मोठे कौतुक झाले होते. तसेच, तिने 'बडे अच्छे लगते है', 'उतरन', 'कसम से', 'साथ निभाना साथिया' या मालिकांमध्येदेखील काम केले होते. मराठी हिंदी मालिका विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून तिची ओळख होती.

प्रिया वर्षभरापासून सोशल मीडियावर सक्रिय नव्हती. ११ ऑगस्ट २०२४ ला तिने पती शंतनू मोघेबरोबरचे काही फोटो शेअर केले होते. जयपूरमधील अमेर फोर्टमधील हे फोटो आहेत. प्रियाच्या या जुन्या पोस्टवर चाहते कमेंट्स करीत दु:ख व्यक्त करीत आहेत.

''एक वर्षभरापूर्वीची पोस्ट'', ''कॅन्सर झाला होता, धक्कादायक आहे'', ''प्रियाचे असे निधन, इतक्या कमी वयात खूप धक्कादायक बातमी आहे. खूप चांगल्या व्यक्तिमत्त्वाची होती. पवित्र रिश्ता या मालिकेतून सर्वांची मने जिंकणारी अर्चनाची बहीण वर्षा आज निघून गेली कायमची. भावपूर्ण श्रद्धांजली'', अशा अनेक कमेंट्स पाहायला मिळत आहेत.

समोर आलेल्या माहितीनुसार, अडीच वर्षांपासून ती कर्करोगाशी झुंज देत होती. सायंकाळी ४ वाजता तिच्यावर अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत.

# विमुक्त भटके सन्मान दिनानिमित्त मेहकरमध्ये सामाजिक सशक्तीकरणाचा उत्सव

## एम.बी.बी.एस.साठी निवड झालेल्या विद्यार्थिनींचा गौरव, नागरिकांना सरकारी दाखल्यांचे वितरण





**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी:** विमुक्त भटक्या समाजाच्या हक्कांच्या सन्मानार्थ, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षी ३१ ऑगस्ट रोजी 'विमुक्त भटके सन्मान दिन' साजरा केला जातो. त्या अनुषंगाने यंदाचा दिवस मेहकर तहसील कार्यालयात सामाजिक ऐक्य, सन्मान आणि सशक्तीकरणाच्या प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार विवेक नलाट होते. विशेष अतिथी म्हणून विमुक्त भटके जाती संघटनाचे राज्याध्यक्ष मा. समाधान गुऱ्हाळकर, भारत मुक्ती मोर्चाचे राज्य महासचिव भागवत जाधव, तसेच भानुदास पवार, विजय पवार, गणेश सोळंके, दामोदर परकाळे आणि नामदेव बिलावर यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. विशेष आकर्षण ठरले ते भोसा (ता. मेहकर) येथील आदिवासी समाजातील अशोक बेले यांच्या दोन कन्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील प्रवेश परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करत *एम.बी.बी.एस.*साठी निवड मिळवली. या गुणवंत विद्यार्थिनींचा जिवन वानखेडे यांच्या हस्ते कौटुंबिक सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशाने संपूर्ण समाजात आशेचा नवा किरण पसरला.

यानंतर विविध गावांतील विमुक्त भटके समाजातील नागरिकांना जात, उत्पन्न, निवासी आदी शासकीय दाखले प्रदान करण्यात आले. हे दस्तऐवज मिळाल्यामुळे समाजातील अनेक कुटुंबांना शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक योजनांचा थेट लाभ घेता येणार आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सदाशिव पिसे यांनी उत्साहपूर्णपणे पार पाडले, तर विनोद भुसारी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या यशस्वी उपक्रमामध्ये अमोल ठाकरे, जिवन वानखेडे, विवेक वानखेडे, नागेश डाखोरे, प्रशांत कष्टे, पुरुषोत्तम नवले, विनोद वानखेडे, संतोष गवळी, मनोहर सरोदे, मंगेश फालके यांच्यासह अनेक सेतूधारक कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

कार्यक्रमास तालुक्यातील विविध गावांतील शेकडो विमुक्त भटके समाजबांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. संपूर्ण परिसरात सन्मान, अभिमान आणि सामाजिक जागृतीचा सकारात्मक उत्साह दिसून आला.

हा कार्यक्रम केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता, समाजाच्या मुख्य प्रवाहात विमुक्त भटक्या समाजाच्या समावेशासाठीचा एक पायरी ठरू शकतो. शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी, शिक्षणातली प्रगती, आणि ओळखीच्या कागदपत्रांनी मिळणारा आत्मसन्मान हे सर्व या कार्यक्रमातून प्रभावीपणे समोर आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# गणपती दर्शन: श्रद्धा, संस्कृती आणि सोहळा


सार्वजनिक आणि घरगुती गणेशमूर्तींच्या आरासांनी सजलेले रस्ते, ढोल-ताशांच्या गजरात निघणारे बाप्पांचे आगमन सोहळे, आणि भक्तीभावाने गजबजलेली मंदिरे हे दृश्य म्हणजे गणेशोत्सवाची खरी ओळख.

गणपती दर्शन म्हणजे केवळ देवदर्शन नाही, तर ते असतं आपल्या श्रद्धेचं प्रतिबिंब. बालमित्र गणपतीपासून ते गडगडत्या सिंहासनावर विराजमान झालेल्या महाराजांपर्यंत प्रत्येक मूर्ती मनात भक्तीचं भाव निर्माण करते.

आजच्या धकाधकीच्या जीवनात हे काही क्षण शांततेचे, समाधानाचे असतात. घराघरांतून, मंडपांमधून येणाऱ्या आरतींच्या सुरांनी आसमंत भारून जातो. ऑनलाइन दर्शनाची सोय असली, तरी प्रत्यक्षात जाऊन बाप्पाला पाहण्याची अनुभूती काही औरच!

गणेशोत्सव आपल्याला एकत्र येण्याचं, आपली संस्कृती जपण्याचं आणि नवचैतन्याने पुढे जाण्याचं बळ देतो.


गणपती बाप्पा मोरया!




विघ्नहर्ता गणेश मंडळ, डोणगाव



जिजामाता गणेश मित्र मंडळ



भोईराज गणेश मंडळ डोणगाव



राडा बॉईज गणेश मित्र मंडळ डोणगाव

## मराठा आंदोलनकर्त्यांसाठी कल्याणमधून जेवण आणि पाणी घेऊन कार्यकर्ते मुंबईच्या दिशेने रवाना

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांचे मुंबई आझाद मैदानात आंदोलन सुरु आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येत मराठा बांधव सहभागी झाले आहेत. या आंदोलनकर्त्यांसाठी जेवण पाण्याची सोय कल्याणमधील सकल मराठा समाज मराठा सेना यांच्या वतीने करण्यात आली आहे. पाणी आणि जेवण घेऊन एक टेम्पो मुंबईच्या दिशेने रवाना झाला आहे. जोपर्यंत आरक्षण मिळणार नाही. तोपर्यंत हे आंदोलन संपणार नाही.




# मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था सारथी

राज्यातील प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सामाजिक, आर्थिक सक्षमीकरण व शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने २०१९ पासून 'सारथी' ही संस्था सुरू केली आहे. मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था म्हणून 'शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती' या बोधवाक्याखाली छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ही संस्था शिक्षण, मार्गदर्शन, कौशल्यविकास, रोजगार, उद्योजकता, संशोधन आणि सांस्कृतिक वारसा संवर्धन या सर्व क्षेत्रांत ६३ विविध उपक्रम राबवत आहे.

सारथी संस्थेमधील सन २०२१-२२ ते २०२४-२५ एकूण चार वर्षांमध्ये ८ लाख ३८ हजार ४७७ लाभार्थ्यांनी सहभाग घेतला असून अनेक विद्यार्थी या संस्थेमार्फत मार्गदर्शन घेऊन विविध क्षेत्रात यश संपादन करत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि मार्गदर्शनावर आतापर्यंत ६४७ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. सारथी संस्थेमधील विद्यार्थी दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये निवडून येण्याचा नवीन उच्चांक निर्माण करत आहेत.

### शैक्षणिक संधी व शिष्यवृत्ती योजना

सारथी मार्फत विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण, मुलाखतीची तयारी, मार्गदर्शन यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. सारथीच्या स्थापनेपासून २०२० ते २०२४ या कालावधीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षेमध्ये ११२ विद्यार्थी निवडून शासनामध्ये सेवा बजावत आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामध्ये २०२० ते २०२३ या कालावधीत १०४८ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले असून वर्ग एक मध्ये २२९ तर वर्ग दोन मध्ये ८१९ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

### कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

सारथी मार्फत राबविण्यात येणारा छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व विकास व संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम हा महाराष्ट्र राज्यातील सर्व तालुकास्तरावर राबवण्यात येतो. या योजनेमध्ये कालानुरूप विविध अभ्यासक्रम शिकवले जातात. सन २०२२ ते २०२५ या कालावधीत एक लाख २० हजार लाभार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार होते, त्यापैकी ९७ हजार २८६ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून ३४ हजार ३०४ लाभार्थ्यांनी आपले प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यापैकी ७३६५ लाभार्थ्यांना नोकरी मिळाली असून ९४१८ लाभार्थ्यांची मुलाखत प्रक्रिया सुरू आहे. सध्या महाविद्यालयांमध्ये १७ हजार २५१ लाभार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

### श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी इंडो जर्मन टूल रूम कौशल्य प्रशिक्षण उपक्रम

या उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजी नगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर येथे आयटीआय, पदविका व अभियांत्रिकी पदवी प्राप्त १०१२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यापैकी ६५७ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले असून ३१४ विद्यार्थ्यांना नोकरी लागली आहे.

### परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये एकूण ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना आज अखेर एकूण सहा कोटी रुपयांच्या शिष्यवृत्ती रकमेचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेअंतर्गत एकूण ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सन २०२५ करिता ७५ जागांसाठी दिनांक १६ जून २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते, यामध्ये निवड प्रक्रिया सुरू आहे.

### डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती

देशातील नामवंत २०० विद्यापीठात शिकणाऱ्या ३०० विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती देण्यात येते. यामध्ये शिक्षण शुल्क, लायब्ररी शुल्क, परीक्षा शुल्क, वसतीगृह शुल्क व भोजन शुल्काची १०० टक्के रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये या योजनेअंतर्गत ४४१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन पाच कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेसाठी २७० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या योजनेसाठी मार्च २०२५ अखेर सहा कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

### उदयोन्मुख कृषी औद्योगिक क्षेत्रातील शैक्षणिक संधी शैक्षणिक शुल्क प्रतिकृती योजना

वसंतदादा साखर संस्था, पुणे येथील इंडस्ट्रियल फर्मिनेशन अँड अल्कोहोल टेक्नॉलॉजी () आणि () विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना असून या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना १०० टक्के शैक्षणिक शुल्क रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. मधील एकूण ८० विद्यार्थ्यांना ४९.४० लाख व मधील एकूण २८ विद्यार्थ्यांना ३४.५४ लाख रूपये शैक्षणिक शुल्क अदा करण्यात आले. यापैकी २०२२-२३ मधील पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण सात विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

### शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी

सेनापती धनाजी जाधव सारथी शेतकरी ड्रोन पायलट प्रशिक्षण योजनेमध्ये राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये ३३० शेतकऱ्यांनी ड्रोन पायलट प्रशिक्षण पूर्ण केले आहे. शेतकरी मावळा सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण अंतर्गत मधुमक्षिका पालन प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये वार्षिक लाभार्थी ५०० असून २०२५ पासून हे प्रशिक्षण सुरू झाले आहे. पशुधन संगोपन व मुरघास निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत वर्षभरात एक हजार लाभार्थ्यांना उरळी कांचन येथील बायफ या संस्थेमार्फत ३० दिवसीय निवासी प्रशिक्षण, ६० दिवसीय प्रक्षेत्रिय प्रशिक्षण ८९ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

### कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

महाराणी सईबाई सारथी रोजगार व स्वयंरोजगार कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम पुणे, वाशिम, कोल्हापूर, गडचिरोली, छत्रपती संभाजी नगर, नांदेड, नागपूर, नाशिक, पालघर, बीड, रत्नागिरी या जिल्ह्यात राबवला जातो. या सर्व जिल्ह्यांत एकूण १४१९ अभ्यासक्रम राबविले जात असून त्यापैकी ९८९ अभ्यासक्रम पूर्ण झालेले आहेत. सरदार सूर्याजी काकडे सारथी वाहन चालक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत आय.डी.टी.आर. भोसरी पुणे येथे हलकी व जड वाहने चालवण्याचे ३० दिवसाचा प्रशिक्षण देण्यात येते. सन २०२५ मध्ये या प्रशिक्षणास सुरुवात झाली असून आत्तापर्यंत ४९ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. सरसेनापती हंबीरराव मोहिते सारथी मोडी लिपी प्रशिक्षण योजनेअंतर्गत २६० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय करियर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिरामध्ये सन २०२२ पासून ते २०२५ मध्ये १९ हजार १९१ विद्यार्थ्यांनी करिअर मार्गदर्शनाचा लाभ घेतला आहे.

### निबंध स्पर्धाचे आयोजन

राजर्षी छत्रपती शाहू महाराज तालुकास्तरीय निबंध स्पर्धा योजनेमध्ये इयत्ता तिसरी ते पाचवी विद्यार्थी व इयत्ता सहावी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेत सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत तीन लाख १६ हजार ५९२ इतके विद्यार्थी सहभागी झाले असून त्यापैकी ९४४४ इतक्या विद्यार्थ्यांनी पारितोषिक प्राप्त केले आहे. या स्पर्धांसाठी १७ लाख ९३ हजार रुपयांची पारितोषिक ठेवण्यात आली होती.

### छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळविण्याच्या दृष्टीकोनातून ही योजना राबविली जाते. छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ पासून ते २०२३ पर्यंत ३०७८ विद्यार्थी योजनेसाठी पात्र होते. त्यापैकी ३९४ विद्यार्थ्यांनी पीएचडी पूर्ण केली असून १०३ विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

### सरसेनापती संताजी घोरपडे उद्योजकता विकास कार्यक्रम

सरसेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत इनक्युबेशन हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून स्टार्टअप कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन व विद्यावेतन स्वरूपात आर्थिक साहाय्य दिले जाते. महाराष्ट्रातील शासनमान्य यादी पैकी १३ इनक्युबेशन केंद्राने सारथी संस्थेबाबत सामंजस्य करार केला आहे. सारथीमार्फत लाभार्थ्यांना एक वर्षासाठी इनक्युबेशन केंद्राकडे प्रायोजित केले जाते. सन २०२५ या वर्षी १२० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे.

### सर्व सोयी-सुविधायुक्त छत्रपती शिवाजी महाराज संकुल

सारथी संस्थेमार्फत पात्र विद्यार्थ्यांना प्राधान्याने सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज संकुल उभारण्यात येत आहेत. या इमारत बांधकामासाठी शासनाने मोफत जमिनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. प्रत्येक संकुलामध्ये ५०० मुलांचे वसतीगृह, ५०० मुलींचे वसतीगृह, ३०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, सारथी विभागीय कार्यालयांचा समावेश आहे. सारथीच्या पुणे येथील मुख्यालयाचे बांधकाम पूर्ण झाले असून नवीन इमारतीमध्ये प्रशासकीय कामकाज सुरू झाले आहे. इतर विभागीय कार्यालयाची कामे प्रगतीपथावर असून लवकरात लवकर ती पूर्ण करण्यात येत आहेत. विभागीय कार्यालय पुणे, सारथी उपकेंद्र कोल्हापूर, विभागीय कार्यालय खारघर नवी मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, सारथी उपकेंद्र लातूर, विभागीय कार्यालय नागपूर, अमरावती यासाठी आठ जिल्ह्यात वसतिगृह, अभ्यासिका, कौशल्य विकास केंद्रे उभारण्यात येणार आहेत.

### सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना

सारथी मार्फत सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना राबवण्यात येत असून यामध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यकाळातील प्रकाशित कागदपत्र, आदेश, हुकूमनामा इत्यादी दस्तऐवज पुराभिलेख संचालनालयाकडून डिजिटल स्वरूपात प्राप्त केले आहेत. या ऐतिहासिक दस्तऐवजाच्या विषयावर पुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. सारथी संस्थेमार्फत शिवराज्याभिषेक अभियान, किल्ले संवर्धन, वृक्षारोपण, जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. यामध्ये पीएचडी करणाऱ्या १०८६ विद्यार्थ्यांनी एक लाख १८ हजार ८३४ सीड बॉल तर अधिकारी कर्मचारी यांनी १३ हजार ६०० सीड बॉल तयार केले. हे सीड बॉल २०२४ मध्ये ७५ किल्ल्यांच्या परिसरात टाकण्यात आले. सरदार शिरोजी इंदलकर सारथी किल्ले संवर्धन अभियानांतर्गत ३८ किल्ले व दोन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांच्या परिसरात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये ८५८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. चावडी वाचन अभियानामध्ये पाच हजार विद्यार्थ्यांद्वारे ग्रामसभांमध्ये योजनांची माहिती प्रसारित करण्यात आली आहे.

### सारथी ची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम

सारथीच्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी सारथीचे संकेतस्थळ https://www.sarthi-maharashtragov.in/, सारथी अँड्रॉइड एप्लीकेशन https://play.google.com/store/apps/details?id=com.srthinew, फेसबुक पेज facebook.com/sarthimaharashtra, यूट्यूब चॅनल @sarthipune१७८, इंस्टाग्राम अकाउंट : https://www.instrgram.com/sarthi.pune?igsh=MTjob□g□MzNneXdoOA, आणि सारथी व्हाट्सॲप चॅनेल : https://whatsapp.com/channel/□□□□VaELiPmJUM□hyekQ□R□R सुरू आहे. ज्या द्वारे सारथीच्या योजनांची माहिती सर्वसामान्यांना मिळत आहे. विविध युवा शिबिरे, सारथी दिनदर्शिका वाटप यासारखे उपक्रमातून लाभार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्यात येत आहे.

मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या सारथी संस्थेमुळे हजारो विद्यार्थी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन व शैक्षणिक बळ मिळत आहे. या समाजातील मागास घटकांना सक्षम, स्वावलंबी आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा व नवयुगाची आव्हाने पेलणारा समाज तयार करण्यामध्ये सारथी मोलाची भूमिका बजावत आहे. योग्य शिक्षण, दिशा आणि संधी मिळाल्यास यश मिळवता येते. हे स्वप्न सत्यात उतरवण्याचे काम सारथी संस्था करत आहे. मराठा समाजातील गरजू, होतकरू युवक व युवती या संस्थेच्या माध्यमातून स्पर्धेच्या युगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात यश संपादन करत आहेत. मराठा समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या समान संधी उपलब्ध करुन विकासाच्या प्रवाहात अग्रेसर ठेवणारी सारथी नक्कीच या समाजासाठी एक दीपस्तंभ ठरत आहे.

**-संध्या गरवारे- खंडारे,**
**विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

विविध वृत्त...

## राज ठाकरे यांनी पूर्ण माहिती घेतली पाहिजे होती; राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेवर एकनाथ शिंदे यांचं प्रत्युत्तर



**सातारा/प्रतिनिधी:** मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबाबत आणि मराठा आरक्षणाबाबत राज ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंना विचारा असं म्हटलं होतं. याच्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिला असून, त्यांनी पूर्ण माहिती घेतली पाहिजे होती. आम्ही आधी दिलेले आरक्षण कोणामुळे गेलं याबाबतची माहिती त्यांनी घ्यायला होती. हायकोर्टामध्ये आम्ही टिकवलेल्या आरक्षण ते विरोधक सुप्रीम कोर्टात का टिकवू शकले नाहीत. असं तत्कालीन मुख्यमंत्री यांना त्यांनी विचारायला हवं होतं.

## गांधी आणि तुकारामांना मारलंत, आता भाजपला मनोज जरांगेंना ठार मारायचं आहे का? शरद पवार गटाच्या नेत्याचा घणाघाती हल्ला

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा–ओबीसी, हिंदू–मुस्लिम वाद वाढला पाहिजे ही भारतीय जनता पक्षाची भूमिका आहे. तुम्ही गांधींना मारलं, तुकारामांना मारलं, आता तुम्हाला जरांगे यांना मारायचा आहे का? असा सवाल करत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या ओबीसी सेलचे प्रमुख राज राजापूरकर (ठरर ठररराज्लीव्री) यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपवर टीका केली आहे. मुख्यमंत्र्यांनी सर्वांचा मुख्यमंत्री व्हावं, फक्त भाजपचा मुख्यमंत्री होऊ नये. समाजाला तोडायचं, दंगली घडवायचं काम आता व्हायला नको पाहिजे.

दरम्यान, मनोज जरांगे आझाद मैदानात उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या तब्येतीच्या चौकशीसाठी आपण त्यांची भेट घेतल्याचं राजापूरकर यांनी सांगितलं. राज राजापूरकर यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची राज्यभरात मंडल यात्रा सुरु आहे. अशातच त्यांच्या या टीकेने आणि मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला दिलेल्या उघड पाठिंब्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे.

नेमकं काय म्हणाले राज राजापूरकर?

’मी देशाचा नागरिक आहे. म्हणून मनोज जरांगे यांच्या तब्येतीची विचारपुस करायला, भेटायला गेलो होतो, मात्र याचा चुकीचा अर्थ घेत ओबीसी मराठ्यांच्या भेटीला, असे वाद लावले जात आहेत. भाजपला हेच पाहिजे आहे. हिंदू–मुस्लिम ओबीसी–मराठा वाद लावणं. मराठा समाजाला आरक्षण मिळालच पाहिजे. सरकारने यावर निर्णय घ्यायचा आहे. मुख्यमंत्र्यांनी हातात बांगड्या तर भरल्या नाहीत ना. एकनाथ शिंदे गावाला निघून गेले की लगेच हे मोदीना भेटायला जातात, शिंदे नाराज झाले त्याला मी काय करू? अजित पवार नाराज झाले की मोदीकडे जातात आणि विचारतात काय करू? आता मराठा समाज नाराज आहे. आंदोलन करत आहे. मग यांची अडचण सोडवा. तुम्ही गांधींना मारलं, आता जरांगेना मारणार आहात का? काय चाललय महाराष्ट्रात? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांनी केला आहे.

जरांगे यांची मागणी म्हणजे राज राजापूरकर यांची मागणी समजायची का? – बबनराव तायवाडे

दरम्यान, राज राजापुरकर यांच्या भूमिकेचा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी निषेध केलाय. मनोज जरांगे यांची मागणी म्हणजे राज राजापूरकर यांची मागणी समजायची का? असा सवाल तायवाडे यांनी उपस्थित केलाय. तर काँग्रेस आमदार अभिजीत वंजारी यांनी काँग्रेसच्या वतीने सावध भूमिका घेत हा त्यांच्या पक्षाचा व नेत्याचा वैक्तिक निर्णय असल्याचे सांगितले. शरद पवार यांनी मराठा आरक्षणासंदर्भात काल केलेल्या सूचनेचे राष्ट्रीय ओबीसी महासंघ व काँग्रेस यांनी समर्थन केले आहे.

## शरद पवारांना टाळलं? पुण्यातील सर्व कार्यक्रम रद्द, अजित पवार तातडीने मुंबईला रवाना

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार तातडीने मुंबईला रवाना झाले आहेत. अजित पवार हे आज पुण्यातील उरळी कांचनमध्ये एका इमारतीचं उद्घाटन करणार होते. या कार्यक्रमाला शरद पवार देखील उपस्थित राहणार होते. पवार काका पुतणे एकाच व्यासपीठावर येणार असल्याने या कार्यक्रमाकडे सगळ्यांचं लक्ष होतं. या कार्यक्रमात दोन्ही नेते काय बोलणार? याकडे देखील सगळ्यांचं लक्ष होतं.

मात्र अजित पवार यांनी पुण्यातील सगळे कार्यक्रम रद्द केले आहेत. ते तातडीने मुंबईला रवाना झाले आहेत. मुंबईत एक महत्त्वाची बैठक होणार असल्याची माहिती मिळत आहे. याच बैठकीला हजर राहण्यासाठी अजित पवार मुंबईला येत असल्याची माहिती आहे. पण मुंबईतील बैठकीचं कारण समोर आलं असलं तरी अजित पवार यांनी शरद पवारांना टाळल्याची देखील चर्चा आहे. असं अचानक अजित पवार मुंबईला रवाना झाल्याने चर्चांना उधाण आलं आहे.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा दणका! आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी थेट रस्त्यावर; चार दिवसांत काम सुरु करण्याचे आश्वासन

## ‘जुमले’ नाहीत, कृती हवी! राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष आखाडे यांचा प्रशासनाला झणझणीत







दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/कार्यालय प्रतिनिधी:** डोणगाव ते आरेगाव रस्त्याच्या रखडलेल्या कामामुळे संतप्त नागरिक आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या आंदोलनाच्या इशाऱ्यांनंतर अखेर प्रशासन खडबडून जागे झाले आहे. युवक काँग्रेसच्या आक्रमक भूमिकेनंतर आज सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी स्वतः रस्त्याच्या पाहणीसाठी दाखल झाले.

पाहणीनंतर अधिकाऱ्यांनी व कर्मचारी यांनी अवघ्या चार ते पाच दिवसांमध्ये रस्त्याचे काम सुरू करण्याचे ठोस आश्वासन दिले असून नागरिकांमध्ये यामुळे थोडासा दिलासा निर्माण झाला आहे.

डोणगाव ते आरेगाव हा तालुक्यातील महत्त्वाचा मार्ग गेल्या कित्येक महिन्यांपासून अपूर्ण अवस्थेत आहे. पावसाळ्यात चिखल आणि उन्हाळ्यात धूळ यामुळे या रस्त्याने प्रवास करणं नागरिकांसाठी मोठं संकट बनलं आहे. अपघातांची शक्यता, रुग्णवाहिका व शालेय वाहनांची गैरसोय या सर्व समस्यांमुळे परिसरातील नागरिक प्रचंड संतप्त झाले होते.

**राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा आक्रमक पवित्रा**

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे, प्रदेश सचिव पंकज पळसकर आणि विजय सरकटे यांनी कार्यकर्त्यांसह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात जाऊन निवेदन दिलं. मात्र अधिकारी गैरहजर असल्यामुळे कार्यकर्त्यांनी खुर्चीला निवेदन अर्पण करत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला.

गोपाल आखाडे म्हणाले, ‘‘आम्ही वेळोवेळी पाठपुरावा करूनही प्रशासन झोपेत आहे. जर आता चार दिवसांत काम सुरू नाही झालं, तर आम्ही रस्त्यावर उतरून मोठं आंदोलन करू.‘‘

**अखेर प्रशासनाची जाग!**

या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर आज सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी संबंधित ठिकाणी दाखल होऊन संपूर्ण रस्त्याची पाहणी केली. त्यांनी ‘‘चार दिवसांत काम सुरू करू आणि नागरिकांची गैरसोय दूर करू,‘‘ असे स्पष्टपणे सांगितले.

**नागरिकांच्या मागण्या कायम**

नागरिकांनी प्रशासनाच्या आश्वासनाची नोंद घेतली असली, तरी यावेळी काम वेळेत आणि दर्जेदार व्हावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. प्रशासनाने केवळ आश्वासन न देता कृतीतून उत्तर द्यावे, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

पुढील चार ते पाच दिवसांमध्ये काम सुरू होते का? की पुन्हा नवीन तारीख दिली जाईल? नागरिक आणि युवक काँग्रेस दोघेही आता कठोर पावलांची तयारी करत आहेत.

# बीबी येथे पोलिसांकडून पथसंचलन





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** ३१ ऑगस्ट २०२५ रोजी पोलीस स्टेशन बीबी हद्दीत बीबी शहरात आगामी सण–उत्सव, ईद–ए–मिलाद व गणपती विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडावेत. नागरिकांना भयमुक्त वातावरणात सण साजरे करता यावेत तसेच समाज कंटकांवर वचक निर्माण व्हावा यादृष्टीने सण उत्सवाचे पार्श्वभूमीवर मा. पोलीस अधीक्षक बुलढाणा श्री निलेश तांबे साहेब यांचे आदेशानुसार बीबी येथे शक्ती प्रदर्शन रूटमार्चचे आयोजन करण्यात आले होते. गणेशोत्सव आणि ईंद–ए – मिलाद या सणांच्या काळात कायदा व सव्यवस्था अबाधित राहावी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण प्रशासनाकडून नागरिकांना सण आनंद, उत्साह व बंधुभावाने साजरा करण्याचे आवाहन करून सौहार्द व शांततेचा संदेश दिला. कुठल्याही अफवावर विश्वास ठेवू नये असेही सूचित करण्यात आले.

सदरचा शक्ती प्रदर्शन पथसंचालन पोलीस स्टेशन मधून सुरू करून संत सेवालाल महाराज चौक, बस स्टँड, मांडवा रोड, मस्जिद चौक, छ. शिवाजी महाराज पुतळा मार्गे बाजार गल्ली कडून बस स्टँड मार्गे पोलीस स्टेशन येथे समारोप करण्यात आला. सदरचे पथसंचलनाला बीबी पोलीस स्टेशन चे ठाणेदार संदिप पाटील, पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर शिंदे तसेच १४ अंमलदार व २१ होमगार्ड हजर होते.

## लोकसभेला फडणवीसांनी तुमचा गेम केला, राज ठाकरेंसह चंद्रकांत पाटील यांच्यावर मनोज जरांगेंची टीका

**मुंबई/प्रतिनिधी:** मनसे प्रमुख राज ठाकरे आपल्या रोखठोक मतांसाठी ओळखले जातात. आरक्षणच्या मुद्द्यावर त्यांनी आपली भूमिका अनेकदा मांडली आहे. लोकांच्या संख्येच्या राजकारणाला बळी न पडता ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याचे याआधीही दिसून आले आहे. मुंबईत सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनात राज्यभरातून हजारो मराठा आंदोलक आले आहेत. हे आंदोलक आता पुन्हा का आले? असा प्रश्न एकनाथ शिंदेंना विचारला जावा, अशी प्रतिक्रिया राज ठाकरे यांनी दिली होती. या प्रतिक्रियेवर मनोज जरांगे पाटील यांनी आता टीका केली आहे. आज सकाळी आझाद मैदान येथे मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना राज ठाकरेंच्या प्रतिक्रियेबद्दल विचारण्यात आले. यावर ते म्हणाले, ’’दोघे ठाकरे भाऊ चांगले आहेत, त्यांचा ठाकरे ब्रँड चांगला आहे, असे समाजाचे म्हणणे आहे. पण राज ठाकरे विनाकारण मराठ्यांच्या प्रश्नात पडतात. त्यांना आम्ही कधीही विचारलेले नाही.’’

# स्वातंत्र्यानंतरही खरं स्वातंत्र्य मिळायला पाच वर्ष लागली... आणि त्या क्षणाची आठवण आजही तेवढीच जिव्हाळ्याची वाटते





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** विमुक्त भटके दिन, देशाच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा! आज मेहकरमध्ये हा दिवस मोठ्या उत्साहात, एकजूट आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला.‘‘

देश स्वतंत्र झाला १९४७ मध्ये, पण भटक्या समाजाला ‘विमुक्त’ होण्याचा अधिकार मिळाला तो १९५२ मध्ये, ३१ ऑगस्ट रोजी. या ऐतिहासिक दिवसाचे स्मरण म्हणून, आज मेहकर येथे विविध भटक्या जमातींच्या बांधवांनी एकत्र येऊन, मोठ्या प्रमाणात विमुक्त भटके दिवस साजरा केला.

कार्यक्रमाचे आयोजन समाधान गुरलकर, विजय चव्हाण, भानुदास पवार, दुर्गादास काटे आणि भास्कर सावळे यांनी केले. कार्यक्रमात नाथ जोगी, मसणजोगी, घीसाडी, पांचाळ, बंजारा, गोपाळ, वासुदेव, गोंधळी, वडार समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक विजय चव्हाण यांनी केलं, तर संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष पांडुरंग पाटील, अँड. विष्णू सरदार, बळीराम पवार, दामोदर परगले यांनी समाजाच्या न्याय हक्कांवर भाष्य करत शासनावर जोरदार टीका केली.

कार्यक्रमात पारंपरिक नृत्य आणि सादरीकरणांनी वातावरण भारावून गेलं. गोंधळी, मसणजोगी आणि वासुदेव समाजांनी आपल्या परंपरा सादर करत समाजाच्या सांस्कृतिक वैभवाचं दर्शन घडवलं.यावेळी पाळावर राहणाऱ्या मुलांना कपडे वाटप करत समाजातील बांधिलकी जपली गेली. कार्यक्रमात समाजाच्या इतिहासाचा, संघर्षांचा आणि अन्यायाविरोधात लढ्याचा भावनिक आविष्कार दिसून आला.

‘‘संघर्ष अजूनही संपलेला नाही, पण आशेचा किरण आणि एकजुटीची ज्योत आज मेहकरमध्ये नक्कीच प्रज्वलित झाली. विमुक्त समाजाच्या हक्कांसाठीची ही चळवळ अशीच जिवंत राहो, हाच संदेश या दिवशी देण्यात आला.‘‘